REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 9 | JUNE - 2025

# इयत्ता पाचवीच्या इंग्रजी विषयाच्या अध्ययन अध्यापनातील अडचणी शोधून संगणकाद्वारे केलेल्या अध्यापनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

सुदर्शन शिंदे

## प्रास्ताविक : -



एकविसाव्या शतकात जगताना मात्र मातृभाषेला मर्यादा पडताना दिसतात. जग खूप जवळ आलयं हे विविध संशोधनामुळे , पण जे ज्ञान उपलब्ध आहेते इंग्रजी भाषेतून असल्यामुळे इंग्रजी भाषा शिकणेही काळजी गरज बनली आहे. इंग्रजीत असलेले ज्ञान माणूस आपल्या मातृभाषेतून आत्मसाद करुन जास्तीत जास्त ज्ञानाच्या खोलवर जाण्याचा प्रयत्न करत आहे.

संगणकीय युगात इंग्रजीही प्रभावी भाषा मानली जाते म्हणून ३० डिसेंबर १९९९ पासून इंग्रजीही भाषा पहिलीपासून अभ्यासक्रमात लागु करण्यात आली. त्यानंतर अनेक शाळामधूनसेमी माध्यमाचा अभ्यासक्रम लागु करण्यात आला. त्यानंतर अनेक शाळामधुनसेमी माध्यमाचा अभ्यासक्रम लागु करण्यात आला आहे पण आज दहाते बारा वर्षांचे निकाल पाहता त्यामध्ये काही त्रुटी जाणवतात इयत्ता पहिलीच्या वयाचा विचार करता मातृभाषा सोडून परकीय भाषेतून शिक्षण घेणे म्हणजे पोपटपंची करणेहे सर्वसाधारणपणे दिसून येते. परंतू जगाकडे पाहण्यासाठी आंतरशालेय भाषा म्हणून इंग्रजीचे ज्ञान आत्मसात करणे काळची गरज भासत आहे.

## संशोधनाची गरज -

शिक्षकाची गुणवत्ता कार्यक्षमता आणि गुणवैशिष्ट्ये यांचे राष्ट्र विकासातील व शिक्षणक्षेत्रातील महत्त्व स्पष्ट करते.संशोधक गेल्या १२ वर्षापासून इयत्ता पाचवीला इंग्रजी विषयाचे अध्यापन करत आहे.संशोधकाला इंग्रजीचे अध्यापन करताना अनेक समस्या जाणवल्या.संशोधकाने शिक्षक , पालक , विद्यार्थी इतर शाळेतील मुख्याध्यापक , शिक्षक यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली. त्यावेळी संशोधकाला जाणवणाऱ्या अडचणीत्यांनाही जाणवतात असे दिसून आले.त्यामुळेसंशोधकाने सदरसंशोधनासाठी पुढीलसमस्येची निवड केलेली आहे.

**संशोधनसमस्येचे शीर्षक :- इयत्ता पाचवीच्या इंग्रजी विषयाच्या अध्ययन अध्यापनातील अडचणी शोधूनसंगणकाद्वारे केलेल्या अध्यापनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास**

## संशोधनाची उद्दिष्टे :

१. इयत्ता पाचवी इंग्रजी विषयाच्या अध्ययन-अध्यापनातील अडचणींचा शोध घेणे.
२. इयत्ता पाचवीला इंग्रजी विषयात संगणकाद्वारे अध्यापन करण्यासाठी घटकांची निश्चिती करणे.
३. इयत्ता पाचवी इंग्रजी विषयाच्या अध्यापनात संगणक पध्दतीची परिणामकारकतातपासणे.
४. इयत्ता पाचवीला इंग्रजी विषयाच्या अध्यापनात संगणकाद्वारे केलेले अध्यापन आणि पारंपारिक पध्दतीने केलेले अध्यापन यांत तुलना करणे.

**शून्य परिकल्पना :**इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे पारंपारिकपध्दतीने व संगणकाद्वारे अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांच्या संपादणूकीत कोणताही फरक पडत नाही.

**संशोधन पध्दती निवड :**संशोधकानेतीन पध्दतीपैकी वर्णनात्मक व प्रायोगिक अशा दोन्हीसंशोधन पध्दतीची निवड संशोधनासाठी केलेली आहे. प्रायोगिक अभिकल्पापैकी फक्त उत्तर चाचणी अभिकल्पाची निवड केलेली आहे.

**संशोधन पध्दती निवडीची कारणमीमांसा :**प्रस्तुतसंशोधनहे वर्तमानकालीन आहेतसेचसद्यस्थितीचा अभ्यास यात केला गेला आहे. म्हणूनसंशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीमधील शालेय सर्वेक्षण व प्रायोगिक अशा दोन्हीसंशोधन पध्दतीची निवड करण्यात आलेली आहे.

**संशोधनासाठी साधने व तंत्रे निवड कारणमीमांसा :**प्रस्तुत संशोधनासाठी **शिक्षकांसाठी प्रश्नावली** आणि **विद्यार्थ्यांसाठी उत्तर चाचणी** या साधनांची निवड केलेली आहे.

**संशोधनाची नमुना निवड पध्दतीची कारणमीमांसा :-** संशोधकानेसंशोधनासाठी वरील सर्व प्रकारांपैकीसहेतूक नमुना निवड पध्दती या नमुना निवड या पध्दतीची निवड केलेली आहे. संशोधनासाठीसंशोधकाने इयत्ता पाचवीला इंग्रजी विषय शिकविणाऱ्या २० शिक्षकांची प्रतिसादक म्हणून नमुना म्हणून निवड केलेली आहे.एका शाळेमधील इयत्ता पाचवीच्या ५० विद्यार्थ्यांची निवड प्रयोगासाठी केलेली आहे.या विद्यार्थ्यांचे २५-२५ असे दोन गट करण्यात आले आणि एका गटाला पारंपारिक पध्दतीनेतर दुसऱ्या गटालासंगणक पध्दतीने शिकविण्यात आले आणि तुलना करण्यात आले.

**उद्दिष्ट क्र.१ :**इयत्ता पाचवी इंग्रजी विषयाच्या अध्ययन-अध्यापनातील अडचणींचा शोध घेणे.

१. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांपैकी बी.एड. पदवी पूर्ण केलेले फक्त ३ शिक्षक आहेत. त्यापैकी इंग्रजी - इतिहास / भूगोल अध्यापन पद्धती असणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ६७ %आहे .

२. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांपैकी , मराठी माध्यमातून शालेय शिक्षण झालेल्या शिक्षकांचे प्रमाण ८० %आहे , सेमी इंग्रजी माध्यमातून शालेय शिक्षण झालेल्या शिक्षकांचे प्रमाण ०० %आहे. तर इंग्रजी माध्यमातून शालेय शिक्षण झालेल्या शिक्षकांचे प्रमाण २०% आहे.

३. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांपैकी ८० % शिक्षकांनी पुनर्रचित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण पूर्ण केले नाहीतर, २०% शिक्षकांनीते प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

४. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांपैकी फक्त २ शिक्षकांनी पुनर्रचित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. त्यातील एकच शिक्षक प्रशिक्षणात दिलेल्या शिक्षक प्रशिक्षण मार्गदर्शिकेचा अध्यापनासाठी उपयोग करून घेत नाहीत. ही चांगली बाब नाही.

५. शिक्षक प्रतिसादकांपैकी , ५५ टक्के शिक्षकांना प्रत्येक घटकांतील शब्दार्थ सांगण्यास खूप वेळ जातो , ही अडचण आहे, १५ %शिक्षकांना कठीणसंकल्पना इंग्रजीतूनस्पष्ट करता येत नसल्याची अडचण आहे , १५ %शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या इंग्रजीबाबतचे अनाकर्षण जाणवल्याने अध्यापनात अडचणी आहेत.

६. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांपैकी ११ शिक्षकांच्या मते , विद्यार्थ्यांचे इंग्रजी शब्दभांडार कमी आहे व इंग्रजी भाषेचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर कमी आहेत्यामुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमात शिकताना अडचणी जाणवतात , १२ शिक्षकांच्या मते, विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन व लेखनात अडचणी जाणवतात , ८ शिक्षकांच्या मते , विद्यार्थ्यांना इंग्रजीतून दिलेलेस्पष्टीकरण समजत नाही व तसेच त्यांना अभ्यासाबाबत पालकांकडून योग्य ते मार्गदर्शन मिळत नाही , तर केवळ २ शिक्षकांच्या मते विद्यार्थ्यांना इंग्रजीची भीती वाटते व वरील सर्व अडचणी जाणवतात.

७. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांपैकी ९० %शिक्षक अध्यापनासाठी अर्धे इंग्रजी अर्धे मराठी पद्धतीचा वापर करतातततर १०% शिक्षकांनी यापेक्षा वेगळे या पर्यायात आधी पूर्ण मराठी व नंतर पूर्ण इंग्रजी या पद्धतीचा वापर नोंदवला आहे.

८. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांपैकी ९०% शिक्षक नवीन इंग्रजी शब्दांचे मराठीत अर्थ , स्पष्टीकरण देतात , ३५% शिक्षक उदाहरणाद्वारे अर्थ , स्पष्टीकरण देतात , २०% शिक्षक नवीन इंग्रजी शब्दांचे इंग्रजीत अर्थ , स्पष्टीकरण देतात .

९. इंग्रजी माध्यमात अध्यापन करणाऱ्या शिक्षकांपैकी सर्वाधिक शिक्षक म्हणजेच १३ शिक्षक अध्यापनात येणाऱ्या अडचणींवर उपाय काढण्यासाठीसहकारी मित्रांशी व तज्ञांशी चर्चा करतातही अत्यंत चांगली बाब आहे. त्या तुलनेत मुख्याध्यापकांशी चर्चा करणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण २ म्हणजे अत्यंत कमी आहे.

१०. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांपैकीतासिका पुरेशा आहेत असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ९० %आहे , तर १०% शिक्षकांनी यापैकी नाही पर्यायाला प्रतिसाद दिला आहे.

११. तक्ते आणि प्रतिकृती वापरणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण प्रत्येकी ४५ % आहे. स्वनिर्मित साधन वापरणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण १६% Audio साधन वापरणाऱ्यांचे प्रमाण १०% तर सर्व साहित्य वापरणाऱ्यांचे प्रमाण २० % आहे.
१२. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांपैकी अध्यापनास जास्त वेळ लागत असल्याने दैनिक मूल्यमापनास वेळ मिळत नाही , ही अडचण असणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४०% आहे .
१३. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांपैकी play & Learn अध्यापन पध्दती वापरणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण २० %आहे, Demonstration अध्यापन पध्दती वापरणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण २५ %आहे ,Explanation अध्यापन पध्दती वापरणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४० %आहे , Participation अध्यापन पध्दती वापरणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण १५ %आहे .
१४. स्वाध्याय तपासताना क्रियापदापरून काळाचा बोध न होणेही उणिव दिसते असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४० % आहे तर , सहाय्यकारी क्रियापदे वापरताना गोंधळहोतो असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४० %आहे ६०% आहे. विद्यार्थ्यांना इंग्रजी शब्दाचे स्पेलिंग लिहिताना अडचणी येतात असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४०% आहे ६०% आहे.

**उद्दिष्ट क्र.२: इयत्ता पाचवी इंग्रजी विषयाच्या अध्यापनात संगणक पध्दतीची परिणामकारकतातपासणे.**
संगणकाच्या साहाय्याने अध्यापन केल्यानंतर घेतलेल्या उत्तर चाचणीचे मध्यमान 17.24 आले.

**उद्दिष्ट क्र.३:इयत्ता पाचवीला इंग्रजी विषयाच्या अध्यापनात संगणकाद्वारे केलेले अध्यापन आणि पारंपारिक पध्दतीने केलेले अध्यापन यांत तुलना करणे.**

**मध्यमान , t मूल्य व प्रमाणविचलन दर्शविणारा तक्ता**

| | मध्यमान | मध्यमानातील फरक | प्रमाणविचलन | प्राप्त t मूल्य |
|---|---|---|---|---|
| संगणक वापरून केलेले अध्यापन | 17.24 | 3.40 | 2.33 | 4.273 |
| पारंपारिक पध्दती | 13.84 | | 3.22 | |

1. पारंपारिक पध्दतीने अध्यापन केल्यानंतर घेतलेल्या उत्तर चाचणीचे मध्यमान 13.84 आले.
2. संगणकाच्या साहाय्याने अध्यापन केल्यानंतर घेतलेल्या उत्तर चाचणीचे मध्यमान 17.24 आले.
3. दोन्ही पध्दतींच्या उत्तर चाचणीच्या मध्यमानातील फरक 3.40 आहे.
4. पारंपारिक पध्दतीने अध्यापन केल्यानंतर घेतलेल्या उत्तर चाचणीचे प्रमाणविचलन 3.223 आले.
5. संगणकाच्या साहाय्याने अध्यापन केल्यानंतर घेतलेल्या उत्तर चाचणीचे प्रमाणविचलन 2.332 आले.
6. प्राप्त t मूल्य 4.273 आले आहे.
7. 0.05 व 0.01 या दोन्हीसार्थकता स्तरावर df=48 साठी पत्रकाच्या आधारे नमुना t मूल्य अनुक्रमे 2.021 व 2.704 इतके आहे.
8. यावरून अध्यापन केलेल्या घटकाच्या संदर्भात इंग्रजी अध्यापनाच्या पारंपारिक व संगणकाच्या साहाय्याने केलेले अध्यापन पध्दतीमध्येसंगणकाच्या साहाय्याने केलेले अध्यापन अधिक परिणामकारक आहेहे दिसून येते.

**५.२ शिफारशी :**
१. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचे शालेय शिक्षण इंग्रजी माध्यमातून झालेले असावे.
२. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांनी पुनर्रचित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.
३. इंग्रजी अध्यापनासाठी पारंपारिक शैक्षणिक साधनांचा वापर पुरेसा नसूनसंगणक तंत्राचा म्हणजेच आधुनिक तंत्राचा वापर करावा.
४. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांनी अध्यापनात नवीन इंग्रजी शब्दांचे मराठी व इंग्रजी दोन्ही भाषेत अर्थ सांगावेत.
५. प्रत्येक शाळेने विद्यार्थ्यांना संगणकहाताळण्याचीसंधी द्यावी तसेच स्वयंअध्ययनास प्रोत्साहन द्यावे.
६. इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या व्यवहारात इंग्रजी वापर वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा.
७. शिक्षकांनी अधिकाधिक घटकांवर आधारित संगणकावर आधारित कृतिकार्यक्रमतयार करावेत.
८. प्रत्येक शिक्षकानेतंत्रस्नेही व्हावे. शिक्षकांनीसंगणकाच्या साहाय्याने अध्यापन करावे.

९. शिक्षकांनीसंगणकाच्या साहाय्याने अध्यापन करण्यासाठी शैक्षणिक CDs, DVDs,Videos, Audios, Ppts, worksheets, pdf Files यांचा वापर करावा.

१०. शिक्षकांनी वर्गामध्ये अध्यापन करताना LCD Projector , Tablets यांचा वापर करावा.

## संदर्भग्रंथ सूची

१. आगलावे ,प्रदीप. (२०००). संशोधन पध्दतीशास्त्र वतंत्रे. नागपूर : विद्या प्रकाशन.
२. घोरमडे के. यु. , घोरमोडे के. के. (२००३) शैक्षणिकसंशोधनाची मूलतत्वे . नागपूर, विद्याप्रकाशन.
३. चव्हाण किशोर (२००९) , शिक्षण तरंग , अंक १ , नाशिक : अनघा किशोर चव्हाण - इनसाईट पब्लिकेशन्स.
४. भिंताडे वि. रा. (१९९९), शैक्षणिकसंशोधन पद्धती ,सुधारित आवृत्ती , पुणे : नूतन प्रकाशन.
५. मुळे रा. शं. उमाटे वि. तु., (१९७७), शैक्षणिकसंशोधनाची मूलतत्वे , पहिली आवृत्ती , नागपूर :महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.